MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३३९ | शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -339 | SATURDAY DT.31 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


## आर्थिक गुन्हे शाखा बीडचा लाचखोर पोलिस अधिकारी
### हरिभाऊ खाडेनी याच लोकांची भेट घडवून आणली मॉ पॅलेस मंगल कार्यालयात

तत्कालीन एस पी नंदकुमार ठाकूर डिवाएसपी सतोष वाळके पि आय केतन राठोड, लाचखोर हरिभाऊ खाडे यांची चौकशी सीआयडीमार्फत करायला हवी यांच्या व यांच्या नातेवाईकाच्या नावावरून प्रॉपर्टीची ही चौकशी होणे गरजेचे आहे याचं कारण ज्ञानराधाला सुरुवातीपासूनच पाहिलं तर पाठीशी घातलेला आहे. याच पोलीस अधिकाऱ्यांनी ज्ञानराधाचा भ्रष्टाचारावर पडदा टाकला व तो एक वर्षानंतर अंधारातले पाप उजेडात आलेले आहे?

# कुलकर्णीच्या अटकेने ज्ञानराधाची ‘कुल’ ‘करणी’च बाहेर येणार?

## भ्रष्टाचाराच्या ‘नंदनवनातील’ ‘ठाकुर’ यांना खाडेमुळे जय ‘हरी’ म्हणण्याची वेळ?

# अंधारातले पाप आता उजेडात येण्याची शक्यता?

यशवंत कुलकर्णी हा पोलिसांना सुरेश कुटे अर्चना कुटे यांच्या पापाचा घडा भरलेल्या ज्ञानराधाच्या पापाच्या घड्यातून आर्थिक तडजोड करून पैसे देत होता. त्यामुळे यशवंत कुलकर्णी ला सर्वात शेवट अटक करण्याचा प्रयत्न केला आहे का असाच प्रश्न यावेळी उपस्थित होत आहे. परंतु यावेळी यशवंत कुलकर्णी व त्याचा मुलगा यांनी मात्र अक्षरशः नंगानाच केलेला आहे सर्वसामान्य गोरगरिबांच्या ठेवी सुरेश कुटे अर्चना कुटे यशवंत कुलकर्णी सह पोलीस प्रशासनातील काही भ्रष्टाचाराने बरबटलेले तत्कालीन पोलीस अधिकारी यामध्ये सामील आहेत. तर या सर्वांची तोडपाणी करून द्यायला आर्थिक गुन्हे शाखेचा पकडलेला पोलीस अधिकारी सुरेश खाडे हा या सर्वांची तोडपाणी करून देत होता तत्कालीन पोलीस अधीक्षक डीएसपी व खाडे सह इतर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व ठाणे प्रभारी यांचीही या प्रकरणा सकल चौकशी व्हायला हवी कारण यांनी ठेवीदारांचे गुन्हे दाखल करून घ्यायला केलेले आहेत.?

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील एका पेठ बीड मधील नामांकित असलेले मंगल कार्यालय माँ पँलेस तत्कालीन एस पी डी एस पी वेगवेगळ्या ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्या मार्फत ज्ञानराधाच्या भ्रष्टाचाराचे मुख्य सूत्रधार असलेले सुरेश कुटे अर्चना कुटे यशवंत कुलकर्णी सह आर्थिक गुन्हे शाखा बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील लाचलुचपत प्रतिबंधक कारवाईमध्ये अटक केलेला पोलीस अधिकारी हरिभाऊ खाडे यांनी ही बैठक घडून आणली होती तर यावेळी या ठिकाणी २० कोटी रुपयांची लाच ठरल्याची चर्चा दबक्या आवाजात बीड जिल्हा पोलीस दलात जोर धरू लागली मिळत आहे. कारण यावेळी ज्ञानराधाही गेल्या एक वर्षापूर्वीच बुडाली होती. अशी चर्चा बीड जिल्हा पोलीस दलातील काही पोलीस अधिकाऱ्यांमध्ये दबक्या आवाजात चालू आहे. तर दैनिक महाराष्ट्र आरंभला एका बीड जिल्हा पोलीस दलातील एका व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवरती संबंधित प्रकरणाची माहिती सांगितलेली आहे.






ज्ञानराधा बुडणार हे माहित असतांना पोलीस प्रशासनाने बघ्याची भुमिका का घेतली?
पेठ बीडच्या मॉ पॅलेस मंगल कार्यालयामध्ये ज्ञानराधाचे अंधारातले पाप उजेडात आले यशवंत कुलकर्णीच्या अटकेने वीस कोटीची लाच घेतलेले तत्कालीन एसपी डीवायएसपी पि आय अडचणी येण्याची शक्यता? हरिभाऊ खाडेनी बैठक घडवून आणल्याची चर्चा?
पेठ बीडमध्ये मॉ पॅलेस नावाच्या मंगल कार्यालयात रात्री एक वाजता सुरेश कुटे अर्चना कुटे यशवंत कुलकर्णी सह तत्कालीन एसपी, डी वाय एस पी, पि आयची अंधारात रात्री एक वाजता वीस कोटीच्या लाचेची बैठक लाचखोर पि आय हरिभाऊ खाडेनी घडून आणल्याची चर्चा पोलिस दलात?
ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या सुरुवातीपासूनचा तपास हा तत्कालीन एसपी डीवाय एसपी पीआय सह लाचखोर हरिभाऊ खाडे यांची या यशवंत कुलकर्णीच्या समोरासमोर बसून चौकशी होणे गरजेचे?
बीड जिल्ह्याच्या एका पोलीस अधिकाऱ्यांनी दैनिक महाराष्ट्र आरंभ ला सांगितली माहिती.?
मॉ पॅलेस मंगल कार्यालयाचा तो मालक बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांचा मोठा नेता त्याचाही सहभाग असण्याची दाट शक्यता?
तत्कालीन एस पी, डी वाय एस पी, पी आय यांची वीस कोटीच्या लाघचेची बैठक लाचखोर पोलीस अधिकारी हरिभाऊ खाडेच्या माध्यमातून एका पेठ बीड मधील एका मोठ्या व्यापाऱ्याच्या मॉ पॅलेस नावाच्या मंगल कार्यालयात रात्री एक वाजता लाचेची बैठक संपन्न झाली? या बैठकीत अर्चना कुटे, सुरेश कुटे, यशवंत कुलकर्णी हजर?
तत्कालीन एस पी डी वाय एस पी पी आय २० कोटीची लाच घेऊन हरिभाऊ खाडे च्या माध्यमातून ज्ञानराधांच्या पापी लोकांना वाचविण्यासाठी प्रयत्न केले?
ठेवीदारांच्या तक्रारी बीड जिल्हा पोलीस दलातील तत्कालीन एसपी ठाकूर डीवायएसपी वाळके पिआय केतन राठोड हरिभाऊ खाडेनी ठेवीदारांची दिशाभूल केली?
ज्ञानराधाचे अंधारातले पाप उजेडात आले तत्कालीन एसपी डीएसपी पी आय सह अन्य कर्मचाऱ्यांना वीस कोटीची लाच दिल्याची पोलीस दलात चर्चा?
बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांची ईडीमार्फत चौकशी व्हायला हवी तत्कालीन एसपी डीएसपी आणि पी आय यांच्या प्रॉपर्टी ची चौकशी होणे गरजेचे?
तत्कालीन एस पी ठाकूर, डी वाय एस पी वाळके, राठोड, हरिभाऊ खाडे यांचे संगमत होते ज्ञानराधा बुडाली म्हणून कुटे च्या यशवंत कुलकर्णीच्या सांगण्यावरून गुन्हे उशिरा दाखल करायला ठेवीदारांना गुन्हा दाखल करण्यापासून वंचित ठेवले?
ज्ञानराधा मध्ये भ्रष्टाचाराचा पाढ्यात बीड जिल्हा पोलीस दलातील आजी-माजी पोलीस अधिकारी यांचा मोठा हस्तक्षेप?
ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळा म्हणजे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी बीड जिल्हा पोलीस प्रशासनातील तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांना सापडली होती यातच मात्र गोरगरिबांच्या ठेवी अर्चना कुठे सुरेश कुटे यांनी खाल्ल्यानंतर यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांनी हात धुवून घेतले यामध्ये तीन मात्र ही शंका नाही पण

तरी गेले एका वर्षापूर्वी ज्ञानराधावर गुन्हे दाखल करायला गेलेल्या ठेवीदारांना बीड जिल्हा पोलीस दलातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनचे पोलीस प्रभारी हे टाळाटाळ करून समजूत काढून व दादागिरी करून परत पाठवत होते. यामुळे या प्रकरणाला आता वेगळे वळण लागणार आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडवणीस नव्याने बीडला पोलीस अधीक्षक लाभलेले अविनाश बारगळ यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून इडीमार्फत तत्कालीन एसपी डीएसपी सह ज्ञान राधा व इतर बँकांचे घोटाळे करणाऱ्या सर्वच प्रकरणाची ईडीमार्फत चौकशी व्हायला हवी पण या अगोदर सीआयडी मार्फत ही चौकशी व्हायला पाहिजे कारण यांची प्रॉपर्टी नातेवाईकांच्या नावावर स्वतःच्या नावावर किती आहे. याच्यातून सत्य नक्कीच बाहेर येईल जर ज्ञानराधाचे एक वर्षापूर्वी पासून जर जेव्हा व्यवहार फसले तेव्हापासून जर परिस्थिती जनतेसमोर मांडली सत्य परिस्थिती नक्कीच बाहेर पडेल कारण त्यावेळेस मात्र बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी हे ज्ञानराधाच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात तयार का नव्हते. व ज्ञानराधाचे आर्थिक व्यवहार कधीपासून बंद झाले आहेत. याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. सुरुवातीपासून ज्ञानराधाचे प्रकरण दाबण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातील अधिक अधिकारी कर्मचारी हे ज्ञानराधाचे यशवंत कुलकर्णी अर्चना कुटे सुरेश कुटे यांना सहकार्य करत होते. ही बाब ज्यांच्या समोर या अगोदर आलेले आहेत.?

महाराष्ट्र मध्ये गाजलेल्या मल्टीस्टेट बँक वाल्यांनी अक्षरशः नंगानाच चालवलेला आहे ज्ञानराधा सारख्या आजच्या परिस्थितीमध्ये गोरगरिबांच्या ठेवी खाणाऱ्या अर्चना कुठे सुरेश कुठे यांच्या पापातला सर्वात मोठा धनी असलेला यशवंत कुलकर्णी हा आहे या घटनेचा मास्टरमाइंड असल्याचे बोलले जात आहे या घटनेमध्ये मात्र आता याला वेगळेच वळण लागलेले आहे या संबंधित घटनेमध्ये वडवणी तालुक्यातील कवडगावचा रहिवासी असलेला यशवंत कुलकर्णी नावाचा व्यक्ती हा एका कपडा दुकानांमध्ये कामाला होता त्या कपड्या दुकानातील कामगार ते आज करोडोचा कोट्यावधी रुपयाचा प्रॉपर्टीचा मालक झालेला आहे हा सर्व पैसा कुठून आला आहे याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे यशवंत कुलकर्णी गेल्या २५ ते ३० वर्षापासून कुटेंच्या कापडाच्या दुकानात नोकरीला होता कुटेनीही त्याच्यावरती विश्वास टाकला त्यावेळी त्याला सायकल सुद्धा नव्हती जेव्हा त्याच्यात विश्वास टाकला त्या नंतर सायकल ते आज आलिशान गाड्यांमध्ये फिरणारा यशवंत कुलकर्णी हा मास्टरमाईंड आहेच सुरेश कुट यांचा विश्वास संपादन करून कुटेंच्या अत्यंत जवळ जात त्यांनी हळूहळू कोट्यावधी रूपयांची माया जमायला सुरुवात केली खरी मात्र यावेळी ज्ञानराधा मल्टीस्टेट चौपाटील झाल्यानंतर त्याचा भ्रष्टाचाराचा कळस वाढलेला आहे त्यांनी त्याच्या व नातेवाईकांच्या नावावर शेकडो एकर शेती घेऊन ठेवली आहे शिंदे नगर येथे आणि शान बंगला ही बांधला आहे कवडगाव येथे जमीन ही घेतली आहे त्यासह किमती फोर व्हीलर व दाग दागिने यासह आईची जिंदगी जगणारा यशवंत कुलकर्णी व त्याचा परिवार यांच्याकडे इतकी जिंदगी मध्ये मजा करायला पैसा कुठून आला याची चौकशी होणे गरजेचे आहे?

# पुरूषोत्तमपुरी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती वैचारिक पध्दतीने साजरी

## अण्णाभाऊ साठे यांच्या सून सावीत्रीबाई साठे यांची उपस्थिती होती

**प्रतिनिधी, सुनिल थोरात**
**पुरूषोत्तमपुरी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद आवाड (जे.एन.यु.दिल्ली ) हे होते तर ऊदघाटक म्हणून माधव तात्या निर्मळ (नर्मदा उद्योग समूह) हे होते तर मुख्य सत्कारमूर्ती सावीत्रीबाई साठे (अण्णाभाऊ साठे यांच्या सून) या होत्या. मिलिंद आवाड यांनी समाज हा शिक्षणातून घडत असतो. शिक्षणाशिवाय पर्याय नाही.समाजातील तरूण हे मोठे अधिकारी घडले पाहिजेत**

तसेच पुरूषोत्तमपुरी हे गाव जिजांचे प्रयोगशाळा आहे जिजा आगोदर इथे प्रयोग करून पहायचे आणि मग दुसरीकडे करायचे असे वैचारिक मार्गदर्शन केले.तर सावीत्रीबाई साठे यांचा साडीचोळी देऊन सन्मान करण्यात आला व सावित्रीबाईंनी सांगितले की आपल्या मुलांना शिक्षण शिकवा शाळेत पाठवा तोच अण्णाभाऊ चा सन्मान आहे. सुत्रसंचलन बाबासाहेब थोरात यांनी केले.तसेच यावेळी कल्याण आबुज,कचरू कांबळे,संदीप वाघमारे, संजय वाघमारे,परमेश्वर अडागळे,राधे कांबळे,विजय दराडे, अशोक धिरडे,रघुपत शेळके, भाऊसाहेब गोळेकर, महादेव थोरात,दगडू लोखंडे, श्रावण थोरात,भिवाजी थोरात,रमेश लोखंडे, सुंदर भिसे, अशोक थोरात,राजेभाऊ थोरात,पुरूषोत्तमपुरी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती वैचारिक पध्दतीने साजरी...अण्णाभाऊ साठे यांच्या सून सावीत्रीबाई साठे यांची उपस्थिती होती....

प्रतिनिधी, सुनिल थोरात पुरूषोत्तमपुरी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद आवाड (जे.एन.यु.दिल्ली ) हे होते तर ऊदघाटक म्हणून माधव तात्या निर्मळ (नर्मदा उद्योग समूह) हे



होते तर मुख्य सत्कारमूर्ती सावीत्रीबाई साठे (अण्णाभाऊ साठे यांच्या सून) या होत्या. मिलिंद आवाड यांनी समाज हा शिक्षणातून घडत असतो. शिक्षणाशिवाय पर्याय नाही.समाजातील तरूण हे मोठे अधिकारी घडले पाहिजेत तसेच पुरूषोत्तमपुरी हे गाव जिजांचे प्रयोगशाळा आहे जिजा आगोदर इथे प्रयोग करून पहायचे आणि मग दुसरीकडे करायचे असे वैचारिक मार्गदर्शन केले.तर सावीत्रीबाई साठे यांचा साडीचोळी देऊन सन्मान करण्यात आला व सावित्रीबाईंनी सांगितले की आपल्या मुलांना शिक्षण शिकवा शाळेत पाठवा तोच अण्णाभाऊ चा सन्मान आहे. सुत्रसंचलन बाबासाहेब थोरात यांनी केले.तसेच यावेळी कल्याण आबुज,कचरू कांबळे,संदीप वाघमारे, संजय वाघमारे,परमेश्वर अडागळे,राधे कांबळे,विजय दराडे, अशोक धिरडे,रघुपत शेळके, भाऊसाहेब गोळेकर, महादेव थोरात,दगडू लोखंडे, श्रावण थोरात,भिवाजी थोरात,रमेश लोखंडे, सुंदर भिसे, अशोक थोरात,राजेभाऊ थोरात, विलास लोखंडे,अक्षय थोरात,विलास लोंढे,आदीसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. विलास लोखंडे,अक्षय थोरात,विलास लोंढे,आदीसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# धारूर शहरात संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

धारूर (प्रतिनिधी)
नाभिक संघटना किल्ले धारूर संत श्रेष्ठ श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात पुण्यतिथीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. आरती पूजा भाविकांसाठी महाप्रसादाचे व्यवस्था केली होती याप्रसंगी सर्व नाभिक समाज कार्यक्रमास उपस्थित होता श्री.अरुण चोपडे, दत्ता सुरवसे, बालासाहेब शिरसागर, बाळू राऊत, दीपक समर्थ, मारुती राऊत, नितीन राऊत, अशोक काळे, सुरज समर्थ, अशोक सुरवसे,



मिथुन समर्थ, मुरलीधर सुरवसे, रामेश्वर सुरवसे, संतोष काळे, विकास विकास शिरसागर अमोल राऊत, श्रीकांत राऊत, शरद समर्थ, विक्रम राऊत, यादी सर्व नाभिक समाज कार्यक्रमास उपस्थित होता.

# उमापूर येथील जिल्हा परिषद व उर्दू शाळेमध्ये मुख्याध्यापकाचा मनमानी कारभार!

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई : युवकांना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्य शासनाच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थी शिक्षक म्हणून नियुक्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी डीएड, बीएड, पदवी प्राप्त झालेल्या युवकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. परंतु यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी नियमांच्या अधीन न राहता मनमानी कारभार करून जिल्हा परिषद शाळेत लक्की ड्रा करून नियुक्त्या केल्या असल्याचे बोलले जात आहे. तर



दुसऱ्या एका शाळेत गावातील रहिवासी वगळून जवळील संपर्कात असलेल्या चक्क बीड येथील रहिवाशाचा अर्ज स्विकार करून भरती केली आहे. हा प्रकार गेवराई तालुक्यातील उमापूर येथील उर्दू शाळेत उघडकीस आला आहे. यामुळे खऱ्या उमेदवारांना यापासून वंचित राहावे लागत आहे. याप्रकरणी शालेय व्यवस्थापन समितीने व काही ग्रामस्थांनी गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन कळविले आहे. शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना व गावातील युवकांना न कळवता ही भरती करून बीड येथील रहिवाशाचा शिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. उमापूर या गावातील नागरिक व युवकांना न कळवता ही भरती केल्याची सांगितले जात आहे. ही झाल्याली भरती रद्द करून नव्याने नियुक्ती करावी यासाठी गेवराईच्या गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. ही झाल्याली नियुक्ती रद्द न केल्यास लोकशाही मार्गाने जिल्हा परिषद माध्यमिक मुख्याधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याचा इशारा शालेय व्यवस्थापन समितीने दिला आहे. त्यावेळी संतोष राऊत, संभाजी वीर, रामेश्वर दांगट, मुबारक शेख, राजु लोखंडे, दादासाहेब बनसोडे, बाबुभाई शेख,

# मी लढा देणारच तुम्ही साथ द्या - खांडे

## तुरुंगातून बाहेर येत कुंडलिक खांडेंची गर्जना तुमच्या पाठबळावर मी आजही सक्षम- खांडे


बीड(प्रतिनिधी) तुरुंगवास आणि विजनवास हा प्रभु श्रीकृष्णाला आणि प्रभु श्रीराम याना सुध्दा चुकला नाही. नका ते आरोप करुन चांगल्यांना बदनाम करण्याची परंपरा होती आणि आहे. माझ्यासोबतही तेच घडले आहे. सर्वसामान्य कुटुंबातील एक तरुण समाजकारण आणि राजकारणात बदल घडवू पाहात आहे हे प्रस्थापितांच्या नजरेत खुपले म्हणूनच मला दुर्लक्षीत करण्याचा प्रयत्न होतो आहे. मात्र मी सर्वसामान्यांच्या पाठबळावर लढा देणारच आणि तुमच्यामुळेच मी आज सक्षमपणे निधड्या छातीने लढण्यास तयार झालो असल्याचे प्रतिपादन सरपंच/उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी केले आहे. दोन महिन्याच्या तुरुंगवासातून बाहेर आल्यानंतर हजारो



समर्थकांनी खांडे यांचे जोरदार स्वागत केले. त्या प्रसंगी ते बोलत होते.

जून महिन्यात कुंडलिक खांडे यांना एक प्रकरणात राजकिय हस्तक्षेपामुळे अटक झाली होती. शेवटी न्यायालयाने ॲड.सुदर्शन सोळंके यांच्या सह ड.बाळासाहेब कोल्हे आणि ड.शशिकांत सावंत बचावात्मक कथनाला योग्य मानत कुंडलिक खांडे यांना जामिन दिला. शुक्रवारी सायंकाळी कुंडलिक खांडे यांची मुक्तता झाली. खांडे यांच्या समर्थनार्थ हजारो नागरिक स्वयंस्फुर्तीने त्यांच्या स्वागताला आली.सर्वसामान्यांच्या अलोट प्रेमाला साक्षी मानत कुंडलिक खांडे म्हणाले की, चुकीच्या खटल्यात मला अटक झाली होती. परंतु जनसामर्थ्य आजही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. लोक चुकीचे आरोप करतात मात्र न्यायालय कायम न्याय देते. मला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला होता तो फक्त मी अतिशय लहान कुटुंबातून आलो आहे. मी संघर्ष केला आहे. मला कोणाचाही वरदहस्त नव्हता. गोरगरीब, उपेक्षीत, वंचित घटकांना न्याय देण्यासाठी मी लढलो आणि यापुढेही लढणार आहे ते फक्त तुमच्या पाठबळावर. लढणे हा माझा स्वभाव आहे मी तुमच्यासाठी यापुढेही अहोरात्र कष्ट करीन. तुम्ही फक्त हाक द्या मी माझ्या परीने सर्व शक्तीने साथ देईल असे भावनिक आवाहन कुंडलिक खांडे यांनी केले.

कुंडलिक खांडे यांना दोन उजी महिन्यानंतर जो जामीन मिळाला त्याबद्दल जनतेत समाधान व्यक्त होत आहे. त्यामुळेच शुक्रवारी खांडे समर्थक हजारोंच्या संख्येने त्यांच्या स्वागताला उपस्थित राहिले हे दिसले.



# शरद पवार यांनी झेड प्लस सुरक्षा नाकारली

### केंद्राच्या सुरक्षेवर पवारांना आक्षेप का?

सुरक्षा दलाचं वाहन घेण्यास शरद पवारांनी नकार दिला आहे. स्वत:च्या गाडीत सुरक्षारक्षकाला सोबत नेण्यावर पवारांनी आक्षेप घेतला. तर घरात सुरक्षारक्षकांना प्रवेश देणार नसल्याचंही पवारांनी सांगितलं. घराबाहेर सुरक्षारक्षकांना उभं करायचा निर्णय सुरक्षा यंत्रणांनी घ्यावा असं सांगत सुरक्षा देण्यामागचं कारण अधिकाऱ्यांनी सांगितलं नसल्याचा दावाही शरद पवार यांनी केला आहे.

दिल्ली (प्रतिनिधी)
केंद्र सरकारनं शरद पवारांना झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला होता. दिल्लीतल्या पवारांच्या निवासस्थानी जाऊन गृहखात्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा केली. मात्र शरद पवारांनी ही सुरक्षा व्यवस्था नाकारलीय. झेड प्लस सुरक्षेची गरज नसल्याचं सांगत शरद पवारांनी थेट नकार दिला. उठझऋ आणि दिल्ली पोलिसांच्या १५ अधिकाऱ्यांनीही शरद पवारांशी चर्चा केली. यावेळी पवारांनी आपली बाजू स्पष्टपणे अधिकाऱ्यांसमोर मांडली.

पवारांना सुरक्षा देण्याचा निर्णय केंद्र सरकारनं जाहीर केला होता. तेव्हाच शरद पवारांनी यावर आक्षेप घेत शंका उपस्थित केली होती. सुरक्षेच्या नावाखाली आपल्याकडून माहिती काढण्यासाठी सुरक्षा पुरवली जाऊ शकते, असा संशय पवारांनी व्यक्त केला होता. लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात मोठा फटका बसला. आता विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आहेत.

# महाविद्यालयातील मुलींच्या बाथरुममध्ये छुपा कॅमेरा

### * ३०० मुलींचे व्हिडीओ इंटरनेटवर केले लीक ?
### * प्रकार समोर येताच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर दणाणून सोडला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या दाव्यानुसार, हॉस्टेलमध्ये सापडलेल्या छुप्या कॅमेऱ्याच्या साहाय्याने ३०० पेक्षा अधिक व्हीडिओ रेकॉर्ड करण्यात आले आहेत. हे व्हीडिओ मुलांच्या वसतीगृहात दाखवण्यात आले. या सर्वांवर कठोर कारवाई करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या सांगण्यावरुन शेवटच्या वर्षाला शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याला

ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, त्याच्याकडून अद्याप मुलींचा आक्षेपार्ह अवस्थेतील कोणताही व्हीडिओ मिळालेला नाही. पोलीस आता याप्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

हैदराबाद : आंध्र प्रदेशातील एका इंजिनिअरिंग महाविद्यालयात छुप्या कॅमेऱ्याने हॉस्टेलमधील मुलींचे आक्षेपार्ह अवस्थेतील



**विद्यार्थ्यांचा गंभीर आरोप**

३०० व्हीडिओ चित्रीत करण्याचा आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. महाविद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये असणाऱ्या शौचालयात एक कॅमेरा लपवण्यात आला होता. या कॅमेऱ्याने तरुणींचे आक्षेपार्ह व्हीडिओ चित्रीत करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आंध्र प्रदेशातील गुडलावलेरु कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे ही घटना घडली. यानंतर विद्यार्थ्यांनी रात्रभर आंदोलन करुन महाविद्यालयाचा परिसर दणाणून सोडला.प्राथमिक माहितीनुसार, मुलींच्या वसतीगृहातील एका शौचालयात हा छुपा कॅमेरा लावण्यात आला होता. ही बाब समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांनी तातडीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी महाविद्यालयातील शेवटच्या वर्षाला शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याला ताब्यात घेतले आहे. पोलीस सध्या या सगळ्यांची कसून चौकशी सुरू आहे.

# राहुल गांधी पुन्हा भारत जोडो यात्रा काढणार

**दिल्ली- राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर मार्शल आर्टचा व्हिडिओ पोस्ट केला. या व्हिडीओमुळे त्यांच्या फिटनेसच्या चर्चा झाल्या. याशिवाय या व्हिडिओच्या माध्यमातून राजकीय संदेश देण्याचे कामही राहुल गांधींनी केले. भारत जोडो यात्रा लवकरच काढणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. म्हणजेच राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेचा तिसरा भाग लवकरच सुरू होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राहुल गांधींची ही भारत जोडो यात्रा सुरू होणार आहे.**

यात्रेच्या तिसऱ्या टप्प्याचे नियोजन सुरु भारत जोडो यात्रेच्या तिसऱ्या टप्प्याचे नियोजन सुरु झाले आहे. त्यासाठी यात्रा मार्गाचा नकाशा तयार करण्यात येत आहे. त्यांच्या यात्रा मार्गामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीचा पूर्ण विचार केला जाईल. सर्व तयारी झाल्यानंतर यात्रेची औपचारिक घोषणा केली जाईल, असे सूत्रांनी



सांगितले.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त राहूल गांधींनी आपल्या उर्जेचे रहस्यही सांगितले. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान हजारो किलोमीटरचा प्रवास केला, तेव्हा रोज संध्याकाळी शिबिराच्या ठिकाणी जिउ-जित्सूचा सराव करणे हा दिनक्रम झाला असल्याचे त्यांनी सांगितले. भारत जोडो यात्रे दरम्यान, ज्या शहरात मुक्काम झाला तिथे सहप्रवासी आणि तरुण मार्शल आर्ट विद्यार्थ्यांना एकत्र आणून सराव केल्याचे गांधी यांनी सांगितले. हा व्हिडिओ जारी करताना शेवटी त्यांनी भारत जोडो यात्रा लवकरच सुरु होणार असल्याचे सांगितले.

# निराधारांचा आधार होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार–प्रा.डॉ. विनोद जगतकर

## महाराष्ट्र शासनाच्या परळी तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अशासकीय सदस्यपदी प्रा. डॉ. विनोद जगतकर यांची निवड

**परळी (प्रतिनिधी)**

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाचे नेते, परळी येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथील इतिहास विभाग प्रमुख, पालकमंत्री तथा कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे खंदे समर्थक प्रा. डॉ.विनोद गणपतराव जगतकर यांची संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अशासकीय**



**सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**

या माध्यमातून परळी तालुक्यातील असंख्य निराधार लोकांचा आधार होण्याची संधी त्यांना पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली मिळणार आहे. त्यांच्या या निवडीमुळे परळी तालुका व पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्यांचे स्वागत व अभिनंदन होत आहे.परळी तालुक्यातील प्रत्येक निराधारां पर्यंत ही योजना पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी करेल असे त्यांनी आमच्याशी बोलताना मनोगत व्यक्त केले. ही संधी आपणास दिल्याबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे व वाल्मीक अण्णा कराड यांचे त्यांनी विशेष आभार मानले आहेत.



एकलव्यसंघटनेच्या धामणगाव येथील शाखेच्या उद्घाटन प्रसंगी मोहन घोलवड राज्य संघटक मच्छिंद्र बर्डे टायगर फोर्स तालुकाध्यक्ष कृष्णा बर्डे संपत मोरे अंबादास माळी अनिल माळी आदी मान्यवर उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे

# लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड विधानसभेत जावेत हि सर्वसामान्यांची ईच्छा– विवेक कुचेकर

बीड (प्रतिनिधी)

ज्यांना लोकांनीच लोकनेते हि पदवी बहाल केली असे सर्वसामान्य,वंचित,शोषित, गोरगरीबांचे अश्रु पुसुन, अहोरात्र संकटात धावुन जाणारे लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब हे आता विधानसभेत जावुन सर्वसामान्यांसाठी लढावेत आणी त्यांचे प्रश्न विधानसभेत मांडुन त्यांना न्याय द्यावा अशी ईच्छा आता सर्वसामान्यांची आहे असे प्रतिपादन विवेक कुचेकर यांनी केले आहे.बालाघाटच्या डोंगररांगेतील गाव,वाडी,वस्ती,आणी बीड तालुक्यातील सर्व भागात लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड हे नाव संघर्षाचा महामेरु म्हणून सुपरिचित आहे. सर्वसामान्य कार्येकर्ता म्हणून सुरु केलेले काम ते आज मा. शरदचंद्रजी पवार यांचा विश्वास संपादन करुन उत्कृष्ट सहकारी म्हणुन गौरव प्राप्त करणारे ,ज्यांना लोकांनीच लोकनेते पदवी बहाल केली असे,जे आजही काळ वेळ न पाहता गोरगरीब, वंचित, शोषित, सर्वसामान्य नागरिकाच्या हाकेला धावुन जाणारे,लोकसेवेचा वसा घेऊन आपल्या कार्यातुन जनसेवा साधत, राजकीय क्षेत्रात असुनही कार्येकर्ता म्हणून वावरत समाजकारण आणी विकासकारण साधणारे अशी ज्यांची ओळख आहे असे ते लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब होय,स्वतहा उच्चशिक्षित असुन सर्वसामान्य नागरिकांच्या दैंनदीन समस्यांची जाण व आपल्या परिसरातील छोटयातील छोटया समस्येचा अभ्यास असणारे व त्या समस्या शासन दरबारी मांडुन सोडवण्यासाठी अहोरात्र झगडणारे,स्वतहाला सर्वसामान्य कार्यकर्ता जरी समजत असले तरी ज्यांच्या शब्दाला दस्तुरखुद्द शरदचंद्रजी पवार ,मा.खा.सुप्रिया ताई सुळे,आणी रोहित दादा पवार यांच्या कडे मान आहे असे लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब हे व्यक्तीमत्व आहेत. आम्ही राजकीय आखाडयातला हाडामासाचा आणी जनतेशी घट्ट नाळ जोडुन असलेला व सदैव जमिनीवर पाय रोवुन असलेला लोकनेता पाहत असुन ज्यांच्या कार्याचा आदर करुन नागरिकांनी लोकनेता हि पदवी देऊन गुणगौरव केला आहे अशा डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेबांना आता आमच्या बीड तालुक्याचे आमदार म्हणून विधानसभेत पाठवावे अशी ईच्छा आता नागरिकांनीच व्यक्त केली असल्याचे विवेक कुचेकर यांनी प्रतिपादन केले आहे.कारण



बीड विधानसभा मतदार संघात लोकनेते डॉ.बाबुराव जोगदंड साहेब यांच्या पाठीशी सर्वसामान्य जनता मोठया प्रमाणावर असुन गोरगरीब ,वंचित ,शोषित, पिडीतांचे अश्रु पुसणारे आमचे लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब हे आता विधानभवनात बसुन आमच्या प्रश्नांवर लढतांना आम्हाला बघायचे आहेत ,आमच्या साठी अहोरात्र झगडणार्या लोकनेत्याच्या पाठीशी आता आमच्या तालुक्यातील सर्वसामान्य जनता पाठीशी भक्कमपणे उभी असुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब व खासदार सुप्रियाताई सुळे व आमदार रोहीत दादा पवार हे सुध्दा आम्ही बहाल केलेल्या लोकनेत्याच्या कार्याचा गौरव करुन आमच्या जनतेच्या मणातील आमदार अशी मनोकामना असणाऱ्या डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब यांनाच संधी देतील असा विश्वास बालाघाटावरील सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी व्यक्त केला आहे

# फाशी द्या..फाशी द्या बलात्कारीत आरोपींना फाशी द्या–राजेश्वरी मोरे

बदलापूर आणि कोलकत्ता अत्याचार घटनेतील आरोपींना फाशी देण्यात यावी अशी मागणी राजेश्वरी मोरे यांनी मागणी केली आहे. सरकारच्या विरोधामध्ये प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली.तसेच आरोपींना तात्काळ फाशी देण्याची मागणी करण्यात आली.

नाशिक शहरामध्ये राजेश्वरी मोरे यांच्या नेतृवाखाली बदलापुर व कोलकत्ता घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.गेल्या काही दिवसापूर्वी बदलापूर आणि कोलकाता येथील घटना या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घडल्या असून लहान लहान मुलींवर अत्याचार झाले आहेत.आम्ही सहन तरी किती दिवस करणार याच्या निषेधार्थ राजेश्वरी मोरे यांच्या नेतृवाखाली विद्यार्थिनींनी शहरातून निषेध रॅली काढली. फाशी द्या,फाशी द्या आरोपींना तात्काळ फाशी द्या,महिलांचे संरक्षण करा,मुलींचे संरक्षण करा,अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



संपूर्ण नाशिक शहरातुन निषेध रॅली काढल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ रॅलीचा शेवट करण्यात आला.या ठिकाणी अनेक मुलींनी भाषणे केले.या भाषणातून सरकारवर प्रचंड असा रोष दिसून येत होता.सरकार फक्त बेटी बचाव बेटी पढाव असा नारा देत आहे. मग महिला व मुलींची सुरक्षा कोण करणार. मुली आज रस्त्याने निर्भयपणे फिरू शकत नाहीत.तर आम्हाला शस्त्र परवाना द्या अशी मागणी राजेश्वरी मोरे नी केली आहे .यावेळी राजेश्वरी मोरे यांनी कायद्याबद्दल माहिती सांगितली तसेच जर कुठे छेडछाडीचे प्रकार झाले तर १०० ११२,१०२ या नंबर वर कॉल करण्याचे आवाहन केले तसेच मुलींनीही धाडस दाखवून तक्रारी देण्याची आवाहन त्यांनी यावेळी केले.

# चौसाळा येथिल जय बजरंग गणेश मंडाळाच्या अध्यक्षपदी बबलु शिंदे तर उपाध्यक्षपदी अनिल पवार यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील चौसाळा बसस्थानकासमोरील जय बजरंग गणेश मित्र मंडळाची बैठक चौसाळा येथिल सामाजिक कार्यकर्ते सतिष (भाऊ)जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणी निवडण्यात आली अध्यक्षपदी सर्वानुमते बबलु शिंदे यांची निवड करण्यात आली.तर उपाध्यक्षपदी अनिल पवार सचिवपदी गंगाराम जाधव तर कोषाध्यक्षपदी दिपक जाधव यांची निवड करण्यात आली याबैठकीस अजिनाथ सोनवणे,बाबासाहेब जाधव,गणेश काकडे,पंजाब वाघमारे,किशोर ढोकणे,आण्णा जाधव ,राज जाधव,मारोती पवार,भरत जाधव,सतीष जाधव,बबन



गायकवाड,सुभाष जाधव,उत्तम जाधव,बापु जाधव,सुरेश जाधव,सुरेश शिंदे,रमेश पवार,बबन शिंदे,लक्ष्मण शिंदे,उमेश पवार यांच्यासह जय बजरंग गणेश मंडाळाचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थीत होते.

# शा.वि.ज्ञा. वि. संस्थेतील (स्वायत्त) मराठी विभागात पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांकरिता इंडक्शन कार्यक्रम संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती येथील मराठी विभागातील पदव्युत्तर वर्गाच्या प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम दिनांक ३० ऑगस्ट २०१४ रोजी आयोजित केला होता. एम.ए. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची ओळख करून देणे. मराठी विभागान वर्षभरात घेण्यान येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देणे तसेच परीक्षापद्धती बाबत माहिती देणे हा उद्देश या कार्यक्रमाच्या आयोजनामागील होता.




प्रस्तुत कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. राजेश श्रीखंडे, इंग्रजी विभाग शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था हे उपस्थित होते त्यांचा परिचय प्रा. विद्या शेंडे यांनी करून दिला. डॉ. राजेश श्रीखंडे यांनी संस्थेच्या वैभवशाली परंपरेचा आढावा घेऊन संस्थेत घेतल्या जा विविध उपक्रमांची विस्तृत माहिती दिली. मराठी विभागप्रमुख प्रा डॉ जनार्दन काटकर यांनी मराठी विभागाचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. विभागात घेतल्या जाणाला उपक्रमांची माहिती दिली तसेच अभ्यासक्रम व परीक्षेविषयी माहिती दिली सांनंतर विद्यार्थ्यांनी संगीत विभाग ग्रंथालय, क्रीडा विभागाला भेट देऊन संस्थेची माहिती मिळविली. प्रस्तुत कार्यक्रमाला एम ए. भाग एकला प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी एम ए भाग दोनचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा– विद्या शेंडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा– तृप्ती बेलसरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ संजय लोहकरे प्रा. निकेत चंदिवाले प्रा–दिनेश डूडूल, मयूर कट्यारमल, स्वप्नील गोरे, अरहंत मनवर, जुही कोठारी, अंजू भास्कर यांनी विशेष मेहनत घेतली.

# कृषिमंत्र्यांच्या बीड जिल्ह्यात बोगस पिक विम्याचे रॅकेट सक्रिय बोगस कांदा लागवड प्रकरणात गुन्हे दाखल करा :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

चालु खरीप हंगामात कांदा लागवडीपेक्षा आधिक क्षेत्रावरील बोगस पिक विमा उतरविण्यात आला असुन तालुक्यातील कांदा पेरणीचे क्षेत्र व विमा क्षेत्राची तुलना केली असता गेवराई तालुक्यात ७० हेक्टरवर कांदा लागवड झालेली असुन प्रत्यक्षात विमा ११ हजार ११ हजार १९४ हेक्टरचा विमा काढल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.बीड जिल्ह्यात एकुण ५१५ पट विमा भरला गेला असुन भारतीय कृषी विमा मंडळांकडून संबंधित परीसराची पडताळणी सुरू आहे.कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात बोगस पीक विम्याचे रॅकेट सक्रिय असून कृषी संचालकांच्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी आणि जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी बीड कारवाई करणार का? हा खरा प्रश्न असुन संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, कृषीमंत्री धनंजय मुंडे, कृषी संचालक कृषी आयुक्तालय यांना केली असुन दि.२ सप्टेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.



गेवराई तालुक्यात कांदा लागवड ७० हेक्टर ,विमा संरक्षित क्षेत्र ११,१९४ हेक्टर,बीड तालुक्यात कांदा लागवड ७० हेक्टर,विमा संरक्षित क्षेत्र १७७९, पाटोदा तालुक्यात कांदा लागवड क्षेत्र ३२० ,विमा संरक्षित क्षेत्र ३००७ हेक्टर, आष्टी तालुक्यात कांदा लागवड क्षेत्र ४७३० हेक्टर,विमा संरक्षित क्षेत्र ६६७३ हेक्टर, वडवणी तालुक्यात कांदा लागवड ३८ हेक्टर,विमा संरक्षित क्षेत्र ५७३ हेक्टर, धारूर तालुक्यात कांदा लागवड ६० हेक्टर,विमा संरक्षित क्षेत्र २५८ हेक्टर, अंबेजोगाई तालुक्यात कांदा लागवड क्षेत्र ७५ हेक्टर,विमा संरक्षित क्षेत्र ४५ हेक्टर,केज तालुक्यात कांदा लागवड क्षेत्र १५० हेक्टर,विमा संरक्षित क्षेत्र २९१ हेक्टर, परळी तालुक्यात कांदा लागवड क्षेत्र ६८ हेक्टर,पिक विमा क्षेत्र १०७ हेक्टर एकुण बीड जिल्ह्यात ५६७८ हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड झाली असुन तब्बल २३९२९ हेक्टर पिका विमा संरक्षित क्षेत्राची नोंद असुन मोठ्या प्रमाणावर बोगस विमा भरण्यात आला असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी २०२३ मध्ये बीड जिल्ह्यात बीड नगरपालिकेची जागा दाखवून तसेच तेलंगणा राज्यासह छत्रपती संभाजीनगर, जालना, कोल्हापूर, नागपूर व पुणे जिल्ह्यातील व्यक्तींनी बीड नगरपालिकेची जागा शेत दाखवून तब्बल १६ हजार २२९ एक्करचा पिकविमा उतरवल्याचा गंभीर प्रकार घडला होता संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात यावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दि.२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते.तत्कालिन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांना बोगस पिक विमा संदर्भात तक्रार देण्याचे आदेश दिले होते.मात्र तालुका कृषी अधिकाऱ्यांनी विरोध करत पोलिस ठाण्यात तक्रार करण्यास नकार दिला होता.त्यामुळे बोगस पिक विमा भरणारे, कृषी विभागातील आणि जिल्हा प्रशासनातील अधिकारी यांचे संगनमताने ब्रॅकेट सक्रिय असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली आहे.

कृषी संचालकांच्या सुचनेनुसार बोगस पिक विमा धारकांवर कारवाई होणार का ??

पुणे येथील कृषी आयुक्तालयातील कृषी संचालक विनयकुमार आपटे यांनी बीड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांना कांदा विमा अर्जदार यांचा सविस्तर गावनिहाय तपशील प्राप्त करून त्याची शासकीय यंत्रणेमार्फत तपासणी करावी आणि बोगस अर्ज करणाऱ्या विरूद्ध जिल्हा स्तरीय समितीने कारवाई करावी अशा सूचना काढल्या आहेत तरी कारवाई होणार का?? हा खरा प्रश्न आहे.



# भारतीय जनता पार्टीमध्ये अविनाश साठे यांचा प्रवेश

देशाचे नेते लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब लोकनेत्या पंकजाताई मुंडे साहेब व मा.खा. प्रीतमताई मुंडे यांच्या कार्यावर प्रभावित होत भारतीय जनता पार्टी मध्ये ज्येष्ठ नेते आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) यांच्या उपस्थितीत व केज मतदार संघाच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली फकीरा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष श्री.अविनाश साठे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह प्रवेश केला यावेळी महादेव गव्हाणे,अविनाश लोंढे,सचिन होके,भास्कर गवळी, शुभम गवळी, रवी साठे, अनिल फुले,दीपक वाघमारे व समस्त अविनाश भाऊ साठे मित्र मंडळ तसेच असंख्य कार्यकर्त्यांसह समावेश जाहीर प्रवेश करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ३१ ऑगस्ट विमुक्त दीन म्हणजेच विमुक्त (माजी गुन्हेगारी) जमातींचा स्वातंत्र्यदीन!: डॉ.लक्ष्मण जाधव बीड

बीड (प्रतिनिधी)

आज देशात आरक्षण विषयी आगडोंब उसळला आहे, गुजरातमधील पटेल,हरीयानातील जाट, राजस्थान येथील गुज्जर, आंध्रप्रदेशातील कापू तर महाराष्ट्र राज्यातील मराठा समाज हे आरक्षण मिळावे यासाठी रस्त्यावर उतरून आरपारची लढाई सुरू केली आहे,तर मणिपूरमध्ये तेथील २७ मार्च २०२३ च्या हायकोर्टाच्या मैतयी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्याच्या निर्णयामुळे नागा,कुकी जमातींच्या हिंसक आंदोलनामुळे संपूर्ण मणिपूर जळत आहे.

भारतीय क्रांतिकारकांच्या बलिदान व जहाल -मवाळ गटाच्या विचारांने प्रेरीत असलेल्या देशभक्तांच्यामुळे भारत स्वतंत्र झाला १५ ऑगस्ट १९४७ साली.परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात खरे क्रांतीकारक म्हणून गनिमीकाव्याने-छुपेयुध्द करुन सळो की पळो करून सोडणारे माजी गुन्हेगारी अनेक जाती -जमाती लढत होत्या.यामध्ये टकारी, वडार,बेरड ,बेस्तर,कटबू रामोशी,वाघरी,पालपारधी,राजपारधी, कंजारभाट, राजपूत भामटा, छप्परबंद, कैकाडी, बंजारा,मातंग,केवट , निषाद,बाजीगर,धीवर,लोध,गुजर, गाडी लोहार आदी जमाती होत्या.त्याकाळी ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात लढणारे आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक,भिमा नाईक,बिरसा मुंडा,तंट्या भिल्ल,पुंज्या राणा,गोंविदगीर बंजारा, नारायण सिंग पाईक, बाबुराव शेडमाके,वक्त बुलंदशहा,दलपत शहा,कंवरसिंग वसावा,मडावी खाजा नाईक,भिजण्या भिल्ल,राणी दूर्गावती,सिध्दू कान्होजी,राघोजी भांगरे आदी क्रांतीकारक होते काहींना लढाईत वीरमरण आले तर काही जणांना ब्रिटिश सरकारने फासावर लटकवले.ब्रिटीश सरकारच्या विरोधात बंड करून या जमाती युद्ध करत असत,त्याचा राग धरून हया जमातीची गुन्हेगार जमाती म्हणून शासकीय स्तरावर नोंद करायची व त्या अनुषंगाने त्यांना अपराधीक वागणूक देण्याची प्रथेची सुरवात ब्रिटिश आमदानीच्या सुरवातीच्या कालखंडात १९३३ साली निर्माण झालेल्या रेग्युलेशन २६ या अधिनियामाने झाले.याचे पुढे रुपांतर ठगी व डकॉईटी खात्याच्या निर्मितीत झाले.सन १८६० साली भारतीय दंड संहिता अंमलात आली.पुढे सन१९२४ सालच्या गुन्हेगारी जमाती केंद्रीय अधिनियम कायदयात रुपांतर झाले.हा कायदा सन १९५२ पर्यंत अंमलात होता.३१ ऑगस्ट १९५२ साली रद्द करण्यात आला व आतापर्यंत गुन्हेगारी जमाती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातींना विमुक्त जाती- जमाती या संज्ञेने ओळखले जाऊ लागले.

देशातील गडकिल्ले बांधकाम, उत्कृष्ट गुप्तहेर खाते संभाळणारे रामोशी जमातीतील बहिर्जी नाईक,या जमाती स्वातंत्र्य पूर्व काळापासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दरबारात गुप्तहेर खाते संभाळण्यापासून किल्याची निर्मिती करण्यासाठी याच जमातींचे योगदान आहे,तसेच कोल्हापूर येथील राधानगरी धरण बांधकाम,बाजीराव पेशवे यांच्या मस्तानी हिची संरक्षण करण्याची जबाबदारी असेल,बैलावर दळणवळणाची व्यवस्था करणारे बंजारा, देशहितासाठी इंग्रंजाचा खजिना लुटून भारतीय क्रांतिकारकांना मदत करणं, टोळीयुद्ध करून जेरीस आणणं यामुळे इंग्रज राजवटीत त्यांचे अधिकारी हैराण झाले होते.ब्रिटीशांच्या विरोधात छुपे युद्ध करून त्यांना जेरीस आणलं होतं.सन १८५७ चा विस्कळीत उठाव यामध्ये माजी गुन्हेगारी जमातींचे आदिवासी योध्दे होते,१८३१-३२ दरम्यान इंग्रज आदिवासींमध्ये छोटा नागपूर येथे झालेला कोळ विद्रोह संघर्ष,गौड विद्रोह बस्तर,कुकी विद्रोह बस्तर,वारल्यांचे बंड, ओडिशातील ओरीसा विद्रोह (१८३७-५६),संथाल विद्रोह(१८५५),बिरसा विद्रोह (१८९५)यामुळे इंग्रजांनी १२ ऑक्टोबर १८७२ ते ३१ऑगस्ट १९५२ पर्यंत टोळीवाले हल्लेखोर जमात म्हणून संबोधले आणि खास त्यांच्यासाठी सुड बुध्दीने क्रीमीनल ट्राईब्ज अॅक्ट १८७२ साली तयार करून या जमातींच्या लोंकाना मुंबई, सोलापूर, बारामती,गदग,हुबळी,मुंढवा, मद्रास, विजापूर,पाबळ, खर्डा व इतर ४८ ठिकाणी तीन तारेची काटेरी कुंपने असलेल्या वसाहती(सेटलमेंट) तयार करून ओपन जेल मिस्टर जे.एस.थॉट या इंग्रज वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या कडक निगराणीत डांबण्यात आले.तीनवेळा हजेरी,ओळख परेड, अतोनात छळ करुन त्यांना वेठबिगार म्हणून डांबण्यात आले.लहान मुले,बाळे,स्त्रिया,पुरुषांना आतोनात छळ करण्यात आला.कुटुबांतील एका व्यक्तीने जरी गुन्हा केला तरी संपूर्ण कुटुंबच गुन्हेगार म्हणून डांबण्यात येत असे,काही सेटलमेंट मध्ये तर संपूर्ण जमातीच बंदीस्त करण्यात येऊ लागल्या.भिती ऐवढी होती की त्याकाळी राजेंच्या राजवटीत असलेली जाधव, गायकवाड आडनावे या अनेक जमातींच्या लोकांनी धारण केली त्याचमुळे आजही महाराष्ट्रात टकारी,भामटा,उचले, कैकाडी, वडार,पाथरवट,पाथरुट, गिरणी वडार,घंटीचोर इ.जमातींचे आडनावे प्रामुख्याने जाधव व गायकवाड हीच सापडतील.

या जमातींचे लोक चिवट,लढवय्ये, जंगलातील हिंस्र पशुची शिकार करून गुजराण करत राहत असत, देशाच्या स्वातंत्र्यासाठी निकराने लढा देत होते याचमुळे इंग्रज सरकारने १४ ऑक्टोबर १८७१ साली गुन्हेगारी जमातीचा कायदा अस्तित्वात आणला व वरील जमातींच्या समुहातील घटकांना लागु करण्यात आला.या कायद्यानुसार काही जमातींच्या समुहातील लोकांना जन्मजात गुन्हेगार ठरविण्यात येऊ लागले.



जगाच्या पाठीवर असा एकही कायदा नाही,की ज्या कायदयाने एखादी संपूर्ण जमातच गुन्हेगार ठरते,तो कायदा ब्रिटीशांनी १२ऑक्टोबर १८७१ साली भारतामध्ये भारतीय दंड संहिता म्हणून अस्तित्वात आणला.विमुक्तांना लावण्यात आलेल्या कायद्यामुळे त्यांना जनावरांप्रमाणे डांबण्यात आले, कुटुंबातील एका सदस्याने जरी गुन्हा केला तरी संपूर्ण कुटुंबच बंदीस्त करण्यात येत होते.देशभरात अनेक ठिकाणी यांच्यासाठी सेटलमेंट (जेल) करण्यात आले होते जसे मद्रास, हुबळी,गदग,विजापूर,पुणे, बारामती ,सोलापूर, मुंबई खर्डा,पाबळ,मुंढवा,गुजरात व इतर ४८ ठिकाणी आदी ठिकाणी तुरुंग तयार करण्यात आले होते.याठिकाणी बंदीस्त करण्यात आले होते.

भारतीय संसदेत तात्कालीन कायदामंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रश्न उपस्थित केला की,आज आपण जरी १५ऑगस्ट १९४७ साली जरी स्वातंत्र्य झालो असलो तरी याच देशातील अनेक जाती जमाती या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या जाती जमाती या ब्रिटिश सरकारने अस्तित्वात आणलेल्या १२ ऑक्टोबर १८७२ कायद्यानुसार बंदिस्त केलेल्या अनेक जाती जमाती यागुन्हेगारी जमाती कायद्याच्या अंतर्गततुरुंगातच बंदिस्त आहेत.यावेळी तात्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू याचं लक्ष वेधले त्यावेळी भारतात संसदेत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या जाती जमाती तुरुंगातून मुक्त, विमुक्त करण्यात येत आहे अशी भारतीय संसदेत घोषणा केली,तो दिवस होता ३१ ऑगस्ट १९५२ त्या दिवशी या विमुक्त जातींचा खरा स्वातंत्र्य दिवस म्हणजेच ३१ ऑगस्ट!.

त्यानंतर आमच्या टकारी समाजाचे नेते, सोलापूर शहराचे माजी महापौर तथा दलितमित्र भिमरावजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी तात्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे १२ एप्रिल १९६० साली सोलापूर येथे आले होते.यावेळी त्यांनी लिंबेवाडी सोलापूर येथील सेंटलमेट येथील तीन तारेच्या कुंपनाचे तार तोडून आपण या गुन्हेगारी कायद्यानुसार विमुक्त झालात असं संबोधलं व विमुक्त जाती असा असंवैधानिक नवा प्रवर्ग महाराष्ट्र राज्यात आरक्षणाच्या लाभासाठी तयार करण्यात आला.

आज भारत स्वतंत्र होऊन ७७ वर्ष जरी झाला असला तरी आजही गुन्हेगारी जमातीचा कलंक हा पुसला गेलेला नाही.केंद्रात २७ टक्के आरक्षणात लाभार्थी आहे तर राज्यात विमुक्त जातींना ३ टक्के आरक्षणचा लाभ मिळतो आहे.भटकंती करताना रहिवास एका ठिकाणी नसतो त्यामुळे रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, राशनकार्ड, आधारकार्ड, राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही.

अजूनही या विमुक्त जाती या वंचित - उपेक्षित, दूर्लक्षित -मागास, गोर-गरीब, शोषित -पिडीत, रंजल्या -गांजलेल्या आहेत.यांच्या उत्थानासाठी शासनाने खालील मागण्यांकडे लक्ष देणं गरजेचं आहे.जसे बार्टी,सारथी प्रमाणेच महाज्योती संस्थेला भरीव निधीची तरतूद करणे गरजेचे आहे.भटक्या-विमुक्त जाती जमातींच्या साठी राज्य सरकारने क्रीमिलीअरची अट शिथिल करणे गरजेचे आहे.पदोन्नोतीतील आरक्षण पूर्ववत करावे,कलम ३४१ अन्वये अनुसूचित जाती, अनुच्छेद ३४२ नुसार अनुसूचित जमाती यांच्या सारखेच अनुच्छेद ३४० नुसार केंद्र सरकारने प्रत्येक दहा वर्षांनी जातीनिहाय जनगणना करावी व लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप करण्यात यावं.आजतागयत केंद्र व राज्य शासनाच्या वतीने अनेक आयोग, समित्या, उपसमित्या गठित करण्यात आल्या जसे काकासाहेब कालेलकर आयोग, बाळकृष्ण रेनके आयोग, बी.पी.मंडल आयोग,अग्रवाल आयोग, ईदाते आयोग,बापट कमिशन,थाडे समिति, मुन्शी समिति,अंत्रोळीकर समिति,थाडे समिति,लोकुर समिति आदींच्या शिफारशी लागू करण्यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे.ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्यासाठी सुप्रीम कोर्टात केंद्र व राज्य सरकारने भक्कम बाजू मांडावी तसेच ओंबीसांच्या आरक्षणात घुसखोरी झाली नाही पाहिजे.वसंतराव नाईक महामंडळला भरीव निधीची तरतूद करण्यात यावी, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना तातडीने राबविण्यात यावी व यातील किचकट अटी रद्द कराव्यात.भटक्या-विमुक्त जाती जमातींच्यासाठी पंतप्रधान आवास योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, कैकाडी समाजाचे क्षेत्रबंधन उठवावे जेणेकरून विदर्भात जसं अनुसूचित जातीचे आरक्षणाचा लाभ मिळतो आहे तो संपूर्ण महाराष्ट्रात अनुसूचित जाती आरक्षणाला पात्र राहतील.मागील महिन्यात सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांनी अनुसूचित जाती व जमाती यांच्या आरक्षणात उपवर्गिकरण व क्रीमिलीअरची अट याबाबत जो निर्णय घेतला आहे यासाठी केंद्र सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी.महाराष्ट्र शासन प्रकरण क्रं.३४/२००५ विषय:- विमुक्त जमातीतील अ.क्र.३ वरील भामटा ऐवजी टकारी शब्द प्रयोग करणेबाबत व त्यासमोर उचले, घंटीचोर,पाथरुट,कामाठी,भामटा, गिरणी वडार पाथरवट इ.तत्सम जातींचा समावेश करणेबाबत राज्य मागासवर्ग आयोगाने मागेच शिफारस पाठवलेली आहे याबाबत राज्य सरकारने तातडीने कारवाई करावी व राज्य शासनाच्या मागासवर्गीय जातींच्या यादीतील टकारी मुस्लिम धर्मीयसह ही नोंद रद्द करण्यात यावी व फक्त टकारी हीच जातीची नोंद राज्य शासनाने मागासवर्गीय जातींच्या यादीत समाविष्ट करण्यात यावी.तसेच न्या.बापट कमिशन,न्या.अग्रवाल आयोग,रेनके व ईदाते आयोग यांनी विमुक्त जाती जमातींच्या समुहातील घटकांसाठी अनुसूचित जमातीच्या सारख्या शिफारशी लागू करण्यात याव्यात असं त्यांच्या अभ्यासाअंती अहवालात नमूद केले आहे ते शासनाने यावर निर्णय घेतला पाहिजे. विमुक्त-भटक्या जाती जमातीसाठी आट्रासिटिचे कवचकुंडले प्रदान करण्यात यावीत.

भटक्या -विमुक्त जाती जमातीतील लोक हे भटकंती करत असल्याने अनेक जिल्हयात वास्तव करत पोटाची खळगी भरायला करण्यासाठी जातात तर त्यांच्यावर हल्ले होतात जसं धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील राईनपाडा ये पाच भटक्या -विमुक्त जाती जमातीतील पाच भिक्षुकांची गावगुंडांनी ठेचून हत्या केली होती, तसेच पालघर येथे गोसावी समाजातील भिक्षुकांची हत्या केली त्यानंतर महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी पोरधरी टोळी म्हणून या जाती जमातींच्या समुहातील लोकांवर हल्ले केले जातात, यासाठी राज्य शासनाच्या वतीने या घटकातील भटकंती करणाऱ्यांना ओळखपत्रे देणं गरजेचं आहे.

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकारानुसार या जमातींच्या उत्थानासाठी शासनाने विविध पावले उचलंण गरजेचं आहे व त्या शासकीय योजनेची खालच्या पातळीवर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.आम्हा विमुक्तांना या भारत देशात घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या कायद्यानुसार जगुन दया,आम्हीही भारतीयच आहोत.चोर,दरोडेखोर, गुन्हेगार या कलंकित मानसिकतेच्या माध्यमातून पाहु नये,आम्हीही या भारत देशाचे नागरिक आहोत,एक संशयित नजरेने पाहत जाऊ नये, शासन -प्रशासन-पोलिस प्रशासनाने या जाती जमातींच्या साठी सकारात्मकतेने शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे,खरे गुन्हेगारी प्रवृत्तीचाच बिमोड करावा चुकीच्या पद्धतीने शिक्षणाऱ्यावर गुन्हा दाखल नाही झाला पाहिजे यावर बारकाईने लक्ष देणं महत्त्वाचं आहे. शिक्षणाच्या माध्यमातून या जाती जमातींमध्ये बदल घडतोय या समुहातील घटकांसाठी अनेक सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या संस्थानी पुढे येणं काळाची गरज आहे,या देशाच्या स्वातंत्र्यासाठी अतिशय चिवटपणे जंगलात राहून, इंग्रजांच्या गुन्हेगारी कायद्यानुसार जेलमध्ये राहून लढणाऱ्या या समुहातील घटकांना भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या खरे संवैधानिक अधिकार प्रदान होऊन त्यावर मुलभूतरित्या कायदेशीर खोलवर सखोल अंमलबजावणी झाली तरच हया समुहातील घटकांना ३१ ऑगस्ट प्रमाणेच खरं स्वातंत्र्य मिळेल!.

# मसणजोगी समाजाच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवणार- अनिलदादा जगताप

## पांगर बावडी येथील लाडक्या बहिणींकडून अनिलदादा जगताप यांचे अभूतपूर्व स्वागत




बीड (प्रतिनिधी)

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला राजकारण कधी शिकवलंच नाही. तुमच्या सारख्या गरजू माणसांच्या समस्या सोडून समाधान कमवण्याचे संस्कार त्यांनी आम्हा शिवसैनिकांवर केलेले आहेत. याठिकाणी आज आल्यावर आम्हाला समजतंय की, प्रत्येक पुढऱ्याने तुमचा केवळ मतदाना पुरताच वापर केला असून आपल्या समाज वस्तीकडे कायम दुर्लक्ष केले आहेत. म्हणूनच आजही या वस्तीवर रस्ते, नाली, पाणी, अंगणवाडी सारखे मूलभूत प्रश्न अनुत्तारित राहिलेले आहेत. निवडणुकांना आणखीन वेळ आहे. मी आमदार होईल तेंव्हा होईल. मात्र त्याआगोदर अत्यंत गरजेचा आणि दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असणाऱ्या पाण्याचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत. येत्या दोन चार दिवसातच अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने याठिकाणी पाण्यासाठी बोर घेऊन देण्यात येईल. यामुळे याठिकाणी पाण्याची अडचण काही प्रमाणात सुटेल. याबरोबरच बाळासाहेबांचा शिवसैनिक आणि तळागाळातील माणसांचे जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांचा एक प्रामाणिक कार्यकर्ता या नात्याने आम्ही तुमच्या आडीअडचणीसाठी उभा राहू. येणाऱ्या काळात मसणजोगी समाजाच्या विकासासाठी नेटाने प्रयत्न करून निधी उपलब्ध करून घेणार आणि आजवर प्रत्येकाने दुर्लक्षित केलेल्या या मसणजोगी समाजाच्या समस्या प्राधान्याने सोडवणार असल्याचे अभिवचन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी दिले.

काल रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील पांगर बावडी येथे स्थानिक महिलांनी आम्हा शिवसैनिकांसाठी रक्षा बंधनाचा गोड कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी आम्ही बीड शिवसेनेचे सर्व पदाधिकारी गेलो असता त्यांनी अभूतपूर्व स्वागत करत महिला भगिनींनी औक्षण करून राखी बांधली, अनेक महिला भगिनींचे आशिर्वाद मिळाले. उपस्थित सर्व महिलांना शिवसेनेच्या वतीने साडी भेट दिली. याबरोबरच उपस्थित महिलांशी मुक्त संवाद साधला. त्यांच्या समस्या आडी-अडचणी समजून घेतल्या. आजही या भागात पाण्याची मोठी अडचण असल्याचे समजले. तसेच रस्ते, नाली, शाळा इत्यादी समस्यांचे निवारण करण्यासाठी एक शिवसैनिक या नात्याने पुढाकार घेणार नव्हे सर्वोप्रथम या वस्तीवरील अडचनींचे निवारण करणार आहे. या भागतील अनेक महिलांचे अद्याप आधार कार्ड, मतदान कार्ड, बँक अकाउंट, रहिवाशी, राशन कार्ड देखील काढल्या गेलेले नाहीत म्हणून या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येत नाही. मात्र बीड शिवसेनेच्या वतीने या ठिकाणी कॅम्प लावून आम्ही शिवसैनिक हे सर्व कागदपत्रे काढून देऊन या महिला भगिनींना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देणार आहोत असे या ठिकाणी सांगतले.

माझे सहकारी उप जिल्हा प्रमुख संतोष जाधव आणि राज्य महिला आयोग सदस्या संगीता चव्हाण यांनी लाडकी बहीण योजनेचे महत्व आणि त्याचा अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा याबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी सुनील सुरवसे - शिवसेना जिल्हा संघटक, संतोष जाधव - शिवसेना उपजिल्हाप्रमुख, अजय जाधव -शिवसेना उपजिल्हाप्रमुख, फर्जना शेख- महिला आघाडी उपजिल्हाप्रमख, सुनील अनभूले - बीड विधानसभा प्रमुख, किशोर जगताप- माजी जिल्हा परिषद सदस्य, संजय उडान - माजी नगरसेवक, गजानन कदम - युवा सेना, किशोर गिराम- युवा सेना, प्रतिक कांबळे शिवसेना मीडिया प्रमुख, अमोल जाधव, अमोल जाधव,कृष्णा संखोड,दीपक शेनुरे,सखाराम शेणुरे,सुनील शेणूरे शिवसेनेचे इतर पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांच्यासह महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.



आदर्श गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर.दि.२८-८-२०२४ कबाड गल्ली बीड येथे बैठकी मधे सामजिक उपक्रम राबविले जाणार या वेळी मंडळांचे मार्गदर्शक मा बाळासाहेब आप्पा जाधव मा अशोक आण्णा रोमन मा बंडू भाऊ कदम मा राजाभाऊ साळुंके मा संतोष भाऊ जाधव मा बाळासाहेब कदम मा सोपन भाऊ साळूंके मा शंकर कूरुळे मा विठ्ठल अण्णा काळे मा अतुल जव्हेरी व ❁आदर्श मित्र मंडळ कबाड गल्ली बीड गणेश उत्सवाची कार्यकारिणी जाहीर अध्यक्ष : अभिजीत मस्कर उपाध्यक्ष : भैया भोसले/युवराज पवार सचिव: सिद्धांत मनसबदार सहसचिव: नंदू शिंदे कॅशियर: रोहित कदम सह कॅशियर: अजिंक्य वाघमारे व्यवस्थापक: संदीप जाधव व मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते




# योगेश भैय्या च्या पाठीशी ताकदीने उभा - गोरख काळे

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमांमध्ये योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या पाठीशी गोरख काळे यांनी मोठी ताकद उभा केली. यापुढेही ती ताकद कायम राहील असे मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी स्पष्ट केले.

बीड जिल्ह्यात दोन दिवसापूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा दौरा झाला. या दौऱ्यात विविध गटातील समाजाने उपस्थिती दर्शवली. त्यातच मांगगारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी योगेश भैय्या क्षीरसागर यांचे नेतृत्वाखाली या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ताकद उभा केली. अनेक दिवसापासून गोरख काळे हे योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या साठी जिवाचे रान करीत आहे त्यांना आमदार करण्यासाठी खारीचा वाटा उचलत आहेत. जिल्ह्यातील मांग गारुडी समाज एकत्र करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली. समाजाची ही ताकद योगेश भैय्या क्षीरसागर आमदार होईपर्यंत कायम पाठीशी ठेवणार असल्याचे गोरख काळे यांनी स्पष्ट केले.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT